नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 28/12/2020 (सोमवार)

(दुपार)

## चोरी

पो.स्टे. बुटीबोरी :– अंतर्गत 1 कि.मी अंतरावर साई पार्क वार्ड क्र. 5, बोरखेडी फाटक येथे दिनांक 28/12/2020 चे 04:00 वा. दरम्यान वय 17 वर्षीय दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी मंदीराचे दाराचे कुलुप तोडुन मंदीरात प्रवेश करून गाभाऱ्यात ठेवलेले दोन दान पेटीचे कोंडा वाकवून त्यामधील नगदी व चिल्लर 8,000/–रू. चोरी करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– किशोर अंबादास राऊत, वय 45 वर्ष, रा. बोरखेडी फाटा यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बुटीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि भारती 9850974033 हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो. स्टे. केळवद :– अंतर्गत नांदागोमुख येथे दिनांक 23/12/2020 चे 21.00 वा. दरम्यान मृतक नामे – रोशन सिद्धार्थ बागडे, वय 29 वर्ष, रा. नांदागोमुख हा गावातील जुन्या बसटाप जवळील पिंपळाच्या झाडाजवळील सरकारी विहीरीमध्ये पाण्यात बुडुन मृत अवस्थेत आढळुन आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– पंकज सिद्धर्थ बागडे, वय 31 वर्ष, रा. नांदागोमुख यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस हवालदार रामराव पवार 7875983360 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर